## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- २२६५/२०२२

**अपिलार्थी, श्रीम.लीलाबाई चंद्रकांत घरत**
मु.पो.नविन शेवे,
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा महसूल अव्वल कारकून,
उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे कार्यालय,
जुना ठाणा नाका रोड, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड .

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
पनवेल, जुना ठाणा नाका रोड, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०७.१०.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.०३.२०२२ | -- | ०२.०५.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. ०२.०८.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *"माहिती मिळाली नाही"* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०७.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी श्री.चेतन चंद्रकांत घरत उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सुनिल जाधव, नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी रीम.निखीता आडे, अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनेवल उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" मौजे नविन शेवा, ता.उरण, जि.रायगड या गावाचे पुर्नवसन ज्या नकाशाच्या आधारे करण्यात आले तो तत्कालीन पुर्नवसनाचा नकाशा. (शेवा गावठाण पुर्नवसन योजना, मौजे बोकडविरा) "*

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीस उपस्थित अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांची जागा जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट साठी संपादित करण्यात आली होती. त्याबदल्यात त्यांना नविन गावात पुर्नवसनात भूखंड क्रमांक १७/१ श्री.वामन कृष्णा घरत, क्षेत्रफळ २०९ चौ.मी. देण्यात आलेला आहे. तथापि या भूखंडाचे कोणतेही अधिकार अभिलेख म्हणजे सातबारा किंवा मिळकत पत्र त्यांना प्राप्त झाले नाही.

संबंधित गावातील तलाठी व उप अधीक्षक भूमी अभिलेख, उरण यांनी पुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे मिळकतीचे अधिकार अभिलेखाच्या कागदपत्रांसह उपस्थित राहणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. उप अधीक्षक, भूमी अभिलेख, उरण व तलाठी सजा नविन शेवा, ता.उरण यांनी पुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे मिळकतीचे अधिकार अभिलेखाच्या कागदपत्रांसह स्वत: उपस्थित रहावे.
२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१९.०३.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०७ ऑक्टोबर, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, उरण, ता.उरण, जि.रायगड.
व
तलाठी सजा नविन शेवा, ता.उरण, जि.रायगड.

**-यांना प्रत**
जन माहिती अधिकारी तथा महसूल अव्वल कारकून,
उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे कार्यालय,
जुना ठाणा नाका रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड. **यांचे मार्फत प्रत रवाना.**

**सुनावणी दिनांक १९.०३.२०२५ ( In Continuation of order dt.०७.१०.२०२४)**

**विवेचन**

उपरोक्त दि.०७.१०.२०२४ रोजीच्या आदेशान्वये उप अधीक्षक, भूमी अभिलेख, उरण व तलाठी सजा नविन शेवा, ता.उरण यांना पुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे मिळकतीचे अधिकार अभिलेखाच्या कागदपत्रांसह स्वत: उपस्थित रहाण्याबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १९.०३.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सुनिल जाधव, न ायब तहसिलदार व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.गोविंद राम सगट, सहा.महसुल अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचे युक्तीवादात असे प्रतिपादन केले होते की, त्यांची जागा जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट साठी संपादित करण्यात आली होती. त्याबदल्यात त्यांना नविन गावात पुर्नवसनात भूखंड क्रमांक १७/१ श्री.वामन कृष्णा घरत, क्षेत्रफळ २०९ चौ.मी. देण्यात आलेला होता. तथापि या भूखंडाचे कोणतेही अधिकार अभिलेख म्हणजे सातबारा किंवा मिळकत पत्र त्यांना प्राप्त झाले नाहीत.

आजच्या सुनावणीच्या वेळी नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल उपस्थित आहेत. तसेच सहाय्यक महसूल अधिकारी, उपविभागीय अधिकारी पनेवल यांचे कार्यालय उपस्थित आहेत. त्यांनी असे निवेदन केले की, सदरचे गावठाण सन १९९० साली उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांनी विविध व्यक्तींना नविन पुर्नवसन गावामध्ये भूखंडाचे वाटप केले होते. त्यावेळी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, उरण यांना सदर भूखंडाची मोजणी करुन त्याबाबत कमी जास्त पत्रक पाठविण्याच्या सुचना केल्या होत्या. तथापि कमी जास्त पत्रक प्राप्त न झाल्याने आतापर्यंत ज्या व्यक्तींना भूखंडाचे वाटप झालेले आहे. त्यांचे नावाचा सातबारा झालेला नाही. अजुनही ही जागा सिडकोच्या नावाने आहे.

आजच्या सुनावणीस श्री.मुनीर अत्तार, उप अधीक्षक, भूमी अभिलेख उरण हे देखील उपस्थित आहेत. त्यांनी असे निवेदन केले की, उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडून कमी जास्त पत्रक तयार करुन देण्याचे पत्र त्यांचे कार्यालयात उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्यावर कार्यवाही झाली नाही. तथापि त्यांनी सदरचे पत्र काल प्राप्त करुन घेतले आहे. त्यानुसार ते मोजणी करुन कमी जास्त पत्रक तयार करण्याची कार्यवाही एक महिन्याच्या कालावधीत पूर्ण करुन, तसा अहवाल तहसिलदार उरण यांचेकडे पाठवतील. तसेच तलाठी बोकडवीरा यांनी सदर व्यक्तींच्या नावे वेगवेगळा सातबारा तयार करुन, त्याची प्रत अपिलार्थी यांना पुरविणे योग्य होईल. सबब सदर प्रकरणात वरीलप्रमाणे कार्यवाही करुन, त्याबाबतचा लेखी अहवाल उप विभागीय अधिकारी, पनवेल यांनी पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर सादर करावा. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. श्री.मुनीर अत्तार, उप अधीक्षक, भूमी अभिलेख उरण यांनी सदर प्रकरणी मोजणी करुन कमी जास्त पत्रक तयार करण्याची कार्यवाही एक महिन्याच्या कालावधीत पूर्ण करुन, त्याबाबतचा अहवाल तहसिलदार, तहसिल कार्यालय उरण यांचेकडे पाठवावा. तसेच तलाठी बोकडवीरा, ता.उरण यांनी सदर व्यक्तींच्या नावे वेगवेगळा सातबारा तयार करुन, त्याची प्रत अपिलार्थी यांना पुरवावी.

   सबब सदर प्रकरणात वरीलप्रमाणे कार्यवाही करुन, त्याबाबतचा लेखी अहवाल उप विभागीय अधिकारी, पनवेल यांनी पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२१.०५.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १९ मार्च, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

उपविभागीय अधिकारी, पनवेल, जुना ठाणा नाका रोड,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड.

उप अधीक्षक भूमी अभिलेख, उरण, ता.उरण, जि.रायगड.

तहसिलदार, तहसिल कार्यालय, उरण,
ता.उरण, जि.रायगड.

तलाठी सजा बोकडवीरा, ता.उरण, जि.रायगड.

**सुनावणी दिनांक २१.०५.२०२५ ( In Continuation of order dt.१९.०३.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.१९.०३.२०२५ रोजीच्या आदेशान्वये उप विभागीय अधिकारी, पनवेल यांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २१.०५.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सुनिल जाधव, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय पनवेल उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.गोविंद राम सगट, सहाय्यक महसुल अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल उपस्थित आहेत. तसेच श्री.मुनीर इस्माईल आतार, उप अधीक्षक, भूमि अभिलेख उरण व श्री.पवन चांडक, उपविभागीय अधिकारी पनवेल उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी असे निवेदन कले की, गाव मौजे बोकडविरा, ता.उरण या ठिकाणी नविन शेवा गावाचे पुनर्वसन दि.१७/०२/१९९० साली करण्यात आले. या पुनर्वसनात ३३ हेक्टर जमिन सिडको प्रशासनामार्फत देण्यात आली होती. या विभगातर्फे १० हेक्टर जमिनीवर तातडीने प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले. त्यामुळे पुनर्वसनग्रस्त प्रत्येक नागरिकास किमान ४० चौ.मि.एवढीच जागा देण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी गावकऱ्यांनी आपआपल्या सोयीप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात घरे बांधून राहण्यास सुरुवात केली होती. तसेच काही गावकऱ्यांनी पक्की घरे बांधली आहेत.

संपूर्ण ३३ हेक्टर जमिनीवर पुनर्वसन करावयाचे झाल्यास सद्यस्थितीत जे गावकरी तात्पुरत्या पनर्वसन जमिनीवर घरे बांधुन राहत आहेत. त्यांची घरे तोडावीच लागणार आहेत व त्यास गावकऱ्यांचा विरोध आहे. गावकऱ्यांची मागणी अशी आहे की, त्यांच्या ताब्यात असलेली घरे तशीच ठेवून उर्वरित २३ हेक्टर जागेत आराखडा तयार करुन त्याठिकाणी पुनर्वसन शेतकऱ्यांना भूखंडाची वाटणी करण्यात यावी. याबाबतचा निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. यासंदर्भात कायदेशीर प्रक्रिया पार पाडून निर्णय झाल्यानंतर सुधारित लेआऊट नुसार पुनर्वसनासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जमिनीची मोजणी करुन त्यानुसार उप अधीक्षक भूमी अभिलेख, उरण यांचेकडून कमी जास्त पत्रक तयार झाल्यानंतर प्रत्येक पुनर्वसन शेतकऱ्यांच्या नावाने त्यांना वाटप करण्यात आलेल्या जागेचा गाव नमुना,सातबारा तयार करण्यात येईल व त्याची प्रत गावकऱ्यांना देण्यात येईल. या कालावधीस अंदाजे ३ महिन्यांचा कालावधी लागेल, असे उप विभागीय अधिकारी, पनवेल यांनी सांगितले. सबब सदर प्रकरणी पुन्हा सनुावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच उप अधीक्षक, भूमि अभिलेख, उरण व उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच उप अधीक्षक, भूमि अभिलेख, उरण व उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी पुढील सुनावणीच्या वेळी सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल स्वत: उपस्थित राहून सादर करणे योग्य होईल.
२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१०.०९.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ मे, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
उपविभागीय अधिकारी, पनवेल, जुना ठाणा नाका रोड,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड.

उप अधीक्षक भूमी अभिलेख, उरण, ता.उरण, जि.रायगड.

**सुनावणी दिनांक १०.०९.२०२५ ( In Continuation of order dt. २८.०७.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.२८.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच उप अधीक्षक, भूमि अभिलेख, उरण व उपविभागीय अधिकारी पनवेल यांना पुढील सुनावणीच्या वेळी सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल स्वत: उपस्थित राहून सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १०.०९.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सुनिल किसन जाधव, नायब तहसिलदार तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.गोविंद राम सगर, सहाय्यक महसूल अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल उपस्थित आहेत. शिरस्तेदार, उप अधीक्षक भूमि अभिलेख उरण उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, पनवेल अनुपस्थित आहेत. त्यांनी त्यांचा लेखी अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, मौजे नविन शेवा, ता.उरण या गावच्या पुनर्वसनासाठी जी ३३ हेक्टर जमिन संपादन केलेली आहे त्या जमिनीची तसेच त्यापैकी आजरोजी १० हेक्टर जागेवर ग्रामस्थांची घरे व सार्वजनिक सोयीसुविधा असलेल्या जमिनीची नोजणी करणे आवश्यक आहे. सदर मोजणीनंतर आजरोजी ग्रामस्थांच्या ताब्यात असलेल्या भूखंडाचे क्षेत्र निश्चित होईल व त्यानंतर प्रत्यक्षात देय भूखंडाचे क्षेत्रामधुन ताब्यात

असलेल्या भूखंडाचे क्षेत्र वजा करुन उर्वरीत भुखंड वाटपासाठी नव्याने अभिन्यास करणे आवश्यक आहे. या सर्व प्रक्रियेसाठी सर्वप्रथम सदर जागेची मोजणी करणे आवश्यक असल्याने सदरची मोजणी फी माफ करावी असे पत्र सरपंच ग्रामपंचायत नविनशेवा यांनी जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयाकडे तसेच या कार्यालयाकडे सादर केलेले होते.

ग्रामपंचायत नविन शेवा (मुळ शेवा गाव) या गावातील ग्रामस्थांच्या जमिनी जेएनपीटी साठी सिडको मार्फत संपादीत केलेल्या आहेत. सबब सदर प्रकरणी मोजणी फी भरणेचे झाल्यास याबाबत जेएनपीटी प्रशासनाने सदरची मोजणी फी भरावी असे प्रस्तावित करण्यात आले होते. सदर प्रस्तावानुसार जिल्हाधिकारी रायगड यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक १५/०७/२०२५ अन्वये जेएनपीटी प्रशासनाकडे मोजणी फी भरणेबाबत कळविले आहे. मात्र जेएनपीटी प्रशासनाने सदरची जमिन ही आजरोजी सिडकोच्या नावाने असल्याने जेएनपीटीच्या मालकीची नसलेल्या जमिनीची मोजणी फी भरता येणार नाही असे त्यांचेकडील पत्र दिनांक १४.०८.२०२५ अन्वये जिल्हाधिकारी रायगड यांना कळविले आहे.

वरीलप्रमाणे पत्रव्यवहारानंतर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांनी दिनांक २१.०८.२०२५ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सींग द्वारे सर्व संबंधितांची बैठक घेतली. सदर बैठकीमध्ये अशा सुचना दिल्या की, सदरची ३३ हेक्टर जमीन प्रथम: जेएनपीटीच्या नावावर करावी व तद्नंतर नविनशेवा ग्रामस्थांना देय असलेले भूखंड वाटपाबाबत अधिकार अभिलेख तयार करणेबाबत पुढील कार्यवाही करता येईल. जिल्हाधिकारी रायगड यांनी वरीलप्रमाणे दिलेल्या निर्देशानुसार या कार्यालयाकडील पत्र दिनांक २२/०८/२०२५ अन्वये तहसिलदार उरण यांना सिडको विभाग व जेएनपीटी यांचेशी समन्वय साधून अधिकार अभिलेख अद्यावत करणेबाबत निर्देशीत केलेले आहे.

दि.२१.०५.२०२५ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी उपविभगीय अधिकारी, पनवेल यांनी असे निवेदन केले होते की, संपूर्ण ३३ हेक्टर जमिनीवर पुनर्वसन करावयाचे झाल्यास सद्यस्थितीत पुनर्वसन करण्यासाठी घरे तोडावी लागणार आहेत व त्यास गावकाऱ्यांचा विरोध आहे. गावकऱ्यांची अशी मागणी आहे की, त्यांच्या ताब्यात असलेली घरे तशीच ठेवून उर्वरित आराखडा तयार करुन त्यासाठी पुनर्वसन शेतकऱ्यांना भूखंडाची वाटणी करण्यात यावी. याबाबतचा निर्णय घेण्यासाठीची प्रक्रिया सुरु आहे. यासंदर्भात कायदेशीर प्रक्रिया पार पाडून निर्णय झाल्यानंतर सुधारित लेआऊटनुसार पुनर्वसनासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जमिनीची मोजणी करुन उप अधीक्षक उरण यांचेकडून कमी जास्त पत्रक तयार करुन प्रत्येक पुनर्वसन शेतकऱ्यांच्या नावाने त्यांना वाटप करण्यात आलेल्या जागेचा गाव नमुना, सातबारा तयार करण्यात येईल व त्याची प्रत गावकऱ्यांना देण्यात येईल. त्यामुळे याप्रकरणाची सुनावणी तीन महिन्यांच्या कालावधीनंतर आज ठेवली होती. तथापि आज उपविभागीय अधिकारी यांचे तर्फे सादर करण्यात आलेल्या अहवालाचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. संपूर्ण कालावधीमध्ये मोजणीची फी कोणी भरावी याबाबत देखील निर्णय होऊ शकलेला नाही. ही कार्यवाही होत नसल्याने, अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास विलंब होत आहे. तरी याप्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी शपथपत्र दाखल करणे आवश्यक आहे. सदर प्रकरण जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांच्या शपथपत्रसाठी पुढील सुनावणीवर ठेवण्यात येत आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांनी याप्रकरणामध्ये ते कशाप्रकारे व किती कालावधीमध्ये कार्यवाही पूर्ण करतील याची संपूर्ण रुपरेषा दर्शविणारे शपथपत्र पुढील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सादर करावे.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१३.१०.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० सप्टेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग,
हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

**सुनावणी दिनांक १३.१०.२०२५ ( In Continuation of order dt. १०.०९.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.१०.०९.२०२५ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांना शपथपत्र सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १३.१०.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन


राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ

माहिती अधिकारी श्री.गोविंद राम सगर, सहाय्यक महसूल अधिकारी, उप विभागयी अधिकारी कार्यालय पनवेल उपस्थित आहेत. श्री.प्रमोद जरग यांचे प्रतिनिधी श्री.महासिंग शि-कावगे, शिरस्तेदार, उप अधीक्षक भूमी अभिलेख उरण उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी श्री.पवन चांडक, उपविभागीय अधिकारी, पनवेल उपविभाग, पन वेल यांनी दि.१०.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घटन करण्यासाठी दि.०८.१०.२०२५ रोजी मा.पंतप्रधान यांचा दौरा असल्याने, प्रतिज्ञापत्र तयार करण्याची कार्यवाही होऊ शकली नाही. सदर प्रकरणी प्रतिज्ञापत्र दाखल करणेकामी पुढील तारीख मिळणेबाबत विनंती करण्यात यावी असे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दूरध्वनी संदेशाद्वारे या कार्यालयास कळविणेत आलेले आहे. तरी सदर प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड यांचे प्रतिज्ञापत्र दाखल करणेकामी पुढील एक महिन्यानंतरची तारीख मिळणेस विनंती आहे.

त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांना प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी शेवटची संधी देण्यात येत आहे. जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांनी पुढील सुनावणीच्या दिनांकापूर्वी आपले प्रतिज्ञापत्र सादर करणे योग्य हाईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांनी आयोगाच्या दि.१०.०९.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचे प्रतिज्ञापत्र पुढील सुनावणीच्या दिनांकापूर्वी आयोगासमोर दाखल करावे.
२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२६.११.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ ऑक्टोबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग,
हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-२२६७/२०२२

**अपिलार्थी, श्रीम. लिलाबाई चंद्रकांत घरत,**
**मु.पो. नविन शेवे,**
**ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी, उपजिल्हाधिकारी (भुसंपादन),
मेट्रो सेंटर क्र.१, उरण, सिडको नोडल ऑफीस,
अभियांत्रिकी विभाग, द्रोणागिरी, सेक्टर १४,
बोकडविरा, उरण, ता.उरण, जि.रायगड

प्रथम अपीलीय प्राधिकारी, उपजिल्हाधिकारी (भुसंपादन),
मेट्रो सेंटर क्र.१, उरण, सिडको नोडल ऑफीस,
अभियांत्रिकी विभाग, द्रोणागिरी, सेक्टर १४,
बोकडविरा, उरण, ता.उरण, जि.रायगड

जन माहिती अधिकारी, तहसिलदार उरण
यांचे कार्यालय,उरण, ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक** : ३०.१०.२०२५

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| २४.३.२०२२ | २९.३.२०२२ | ३१.५.२०२२ | ----- |

अपिलार्थी यांनी दि.१२.८.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३०.१०.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. महेश दादा पाटील, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय उरण, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. उध्दव कदम, तहसिलदार, उरण, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुरेश राठोड, शिरस्तेदार, मेट्रो सेंटर क्र.१, उरण हे समक्ष उपस्थित आहेत. तथापि, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. अविनाशकुमार सोनोने हे ऑनलाईन उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(मौजे नवीन शेवा, ता.उरण, जि.रायगड या गावाचे पुर्नवसन ज्या नकाशाच्या आधारे करण्यात आले तो तत्कालीन पुर्नवसनाचा नकाशा (शेवा गावठाण पुर्नवसन योजना, मौजे बोकडविरा) मिळणेबाबत.) "*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

सुनावणी दरम्यान उपस्थित विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री.उध्दव कदम, तहसिलदार, उरण यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना दि.२७.६.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे साध्या टपालाद्वारे माहिती देण्यात आली आहे. तथापि, अशी माहिती प्राप्त झाल्याबाबत अपिलार्थी यांनी नकार दिला. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक माहिती पुढील १५ दिवसांत जलद टपालाने विनामूल्य पुरवून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. **विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय उरण यांनी अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक माहिती पुढील १५ दिवसांत जलद टपालाने नि:शुल्क पुरवून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगाकडे दि.२६.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा.**
२. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२६.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०२५

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-२२६३/२०२२

**अपिलार्थी, श्रीम. लिलाबाई चंद्रकांत घरत,**
**मु.पो. नविन शेवे,**
**ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार,
तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय,
उरण, ता.उरण, जि.रायगड ४०७०२.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा तहसिलदार,
तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय,
उरण, ता.उरण, जि.रायगड ४०७०२

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३०.१०.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २४.३.२०२२ | २९.३.२०२२<br>२२.४.२०२२ | ३१.५.२०२२ | ----- |

अपिलार्थी यांनी दि.२.८.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर व्दितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर व्दितीय अपिलावर आज दिनांक ३०.१०.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. महेश दादा पाटील, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय उरण, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. उध्दव कदम, तहसिलदार, उरण हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" (*मौजे नवीन शेवा, ता.उरण, जि.रायगड या गावाचे पुर्नवसन ज्या नकाशाच्या आधारे करण्यात आले तो तत्कालीन पुर्नवसनाचा नकाशा (शेवा गावठाण पुर्नवसन योजना, मौजे बोकडविरा) मिळणेबाबत)* "

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

सुनावणी दरम्यान उपस्थित विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. महेश दादा पाटील,निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय उरण यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना दि.२७.६.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे साध्या टपालाद्वारे माहिती देण्यात आली आहे. तथापि, अशी माहिती प्राप्त झाल्याबाबत अपिलार्थी यांनी नकार दिला. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक माहिती पुढील १५ दिवसांत जलद टपालाने विनामूल्य पुरवून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. **विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय उरण यांनी अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक माहिती पुढील १५ दिवसांत जलद टपालाने नि:शुल्क पुरवून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगाकडे दि.२६.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा.**

२. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२६.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०२५

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**अपिल क्रमांक : के.आर- २२६५/२०२२**

**अपिल क्रमांक : के.आर- २२६७/२०२२**

**अपिल क्रमांक : के.आर- २२६३/२०२२**

**सुनावणी दिनांक २६.११.२०२५ ( In Continuation of order dt. १३.१०.२०२५, ३०.१०.२०२५)**

**विवेचन**

अपिल क्रमांक के.आर २२६५/२०२२, के.आर २२६७/२०२२, के.आर २२६३/२०२२ हे तिन्ही प्रकरणी एकाच विषयाशी संबंधित असल्याने या तिन्ही प्रकरणांवर एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे. आदेश

अपिल क्रमांक के.आर २२६५/२०२२ मध्ये आयोगाने दि.१३.१०.२०२५ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांना प्रतिज्ञापत्र सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २६.११.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. श्री.भारत वाघमारे, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सुनिल जाधव, नायब तहसिलदार तसेच जन माहिती अधिकारी श्री.गोविंद राम सगर, सहाय्यक महसूल अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय पनवेल उपस्थित

आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.महेश पाटील, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, उरण उपस्थित आहेत.

जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांच्या वतीने उपजिल्हाधिकारी श्री.भारत वाघमारे उपस्थित आहेत. त्यांनी असे निवेदन केले की, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट येथे नवीन अध्यक्षांची नियुक्ती झालेली असल्याने, याप्रकरणात कार्यवाही होण्यास विलंब झाला आहे, परिणामी जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग हे शपथपत्र सादर करु शकले नाहीत. तरी शपथपत्र सादर करण्यासाठी त्यांना एका आठवड्याची वेळ देण्यात यावी, अशी त्यांनी विनंती केली आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी न चुकता ते सदर प्रकरणात कोणती कार्यवाही करणार आहेत. यासंबंधीच्या कालमर्यादा निश्चित करुन आपले शपथपत्र सादर करणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी न चुकता ते सदर प्रकरणात कोणती कार्यवाही करणार आहेत. यासंबंधीच्या कालमर्यादा निश्चित करुन आपले शपथपत्र पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावे.
२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.११.१२.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २६ नोव्हेंबर, २०२५ .

**सुनावणी दिनांक ११.१२.२०२५ ( In Continuation of order dt. २६.११.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.२६.११.२०२५ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांना शपथपत्र सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ११.१२.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सुनिल जाधव, नायब तहसिलदार तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.गोविंद राम सगर, सहाय्यक महसूल अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.महेश दादा पाटील, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, उरण उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी श्री.पवन चांडक, उपविभागीय अधिकारी, पनवेल उपविभाग, पनवेल यांनी दि.११.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये आयोगास अशी विनंती केली आहे की, अपर जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांनी जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांचे शपथपत्र सादर करणेसाठी पुढील तारिख मिळणेची विनंती केली आहे.

आयोगाने जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांना शपथपत्र सादर करण्यासाठी प्रथमत: दि.१०.०९.२०२५ रोजी आदेशीत केले होते. त्या सुनावणीच्या वेळी मा.पंतप्रधान यांचा दौरा असल्याने, त्यांनी शपथपत्र सादर करण्यासाठी पुढील तारखेची मागणी केली होती. त्यामुळे दि.२६.११.२०२५ रोजी शपथपत्र दाखल करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना मुदत देण्यात आली होती. दि.२६.११.२०२५ रोजी उप जिल्हाधिकारी श्री.भारत वाघमारे हे उपस्थित राहिले असून, त्यांनी असे निवेदन केले की, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट येथे नविन अध्यक्षांची नियुक्ती झालेली असल्याने, याप्रकरणात कार्यवाही होण्साठी विलंब झाला आहे. परिणामी जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग हे शपथपत्र सादर करु शकले नाहीत. तर शपथपत्र सादर करण्यासाठी त्यांना एका आठवड्याची वेळ देण्यात यावी. उप जिल्हाधिकारी श्री.भारत वाघमारे यांचे हे निवेदन लक्षात घेऊन, सदर प्रकरणी आज दि.११.१२.२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांनी शपथपत्र सादर करणे आवश्यक होते.

जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांना तीन वेळा संधी देऊन देखील शपथपत्र सादर करण्याचे टाळले आहे. त्यांच्या या वारंवार दिरंगाई करणाऱ्या प्रवृत्तीमुळे अपिलार्थी यांना माहिती मिळण्यासाठी अनावश्यक विलंब होत आहे व त्यांना आर्थिक, शरिरिक व मानसिक त्रास देखील होत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग या सार्वजनिक प्राधिकरणाने अपिलार्थी यांना त्यांना झालेल्या आर्थिक, शरिरिक व मानसिक त्रासापोटी रु.२५,०००/- इतकी नुकसानभरपाई अदा करणे योग्य होईल. सदरचे आदेश माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (८)(ख) अंतर्गत निर्गमित करण्यात येत आहेत.

याप्रकरणी जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांची साक्ष घणे अतिशय आवश्यक असल्याचे दिसू येते. जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग हे साक्ष देण्यास व शपथपत्र सादर करण्यास वारंवार टाळाटाळ करित आहेत. त्यामुळे पुढील सुनावणीस

उपस्थित राहण्यासाठी जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांचेवर समन्स बजावणे योग्य होईल. या समन्सची बजावणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अलिबाग पोलीस स्टेशन व पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग यांचे मार्फत करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थींना माहिती मिळविण्यासाठी जो त्रास सहन करावा लागला त्याची भरपाई म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग या प्राधिकरणाद्वारे अपिलकर्त्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(८)(ख) अंतर्गत रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्यात येत आहे. सदर रक्कम अपिलार्थीस धनादेशाद्वारे अदा करावी व कार्यपुर्ती अहवाल आयोगास सादर करावा.

२. याप्रकरणी श्री.किशन जावळे, जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांची साक्ष घेणे अतिशय आवश्यक असल्याने, त्यांची उपस्थिती आवश्यक आहे. या चौकशी करिता उपस्थित राहणेस्तव उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ यांनी श्री.किशन जावळे, जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (३) (क) अन्वये तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता अनुषंगाने आयोगास प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन पुढील सुनावणीस उपस्थित राहणेबाबत समन्स काढण्यात यावे. सदर समन्सची बजावणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अलिबाग पोलीस स्टेशन व पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग यांचे मार्फत करावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०७.०१.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ डिसेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

उप सचिव,
राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ,
कोकण भवन, ५ वा मजला, रुम नं.५२७, ५२८,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

श्री.किशन जावळे, जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग,
हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ

**सुनावणी दिनांक ०७.०१.२०२६ ( In Continuation of order dt. ११.१२.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.११.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांना उपस्थित राहणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ०७.०१.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी व श्री.राजेन्द्र गणपत घरत उपस्थित आहेत. श्री.किशन जावळे, जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग व श्री.भारत वाघमारे, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सुनिल जाधव, नायब तहसिलदार तसेच जन माहिती अधिकारी श्री.गोविंद राम सगर, सहाय्यक महसूल अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय पनवेल उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी श्री.किशन जावळे, जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी शपथपत्र सादर केले आहे. सदर शपथपत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, "मुळ गाव मौजे शेवा, ता.उरण हे गाव पुर्णपणे विस्थापित करुन मौजे बोकडविरा, ता.उरण येथे मौजे नविन शेवा, ता.उरण या गावाच्या पुनर्वसनासाठी जी ३३ हेक्टर जमिन संपादन केलेली आहे व सदर ठिकाणी पुनर्वसनासाठी भूखंड पाडून त्याचा नकाशा तयार करणेत आलेला आहे व तसे भुखंड वाटपाचे आदेश तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांनी दि.१७/०२/१९९० रोजी काढलेले आहेत. मात्र सदरचा नकाशा व आदेश पारीत करणेपूर्वीच विस्थापित नागरीकांना याच जागेवर तात्पुरता ताबा देण्यात आला व या जागेवर नागरीकांनी आपल्या गरजेनुसार घरे बांधली आहेत. मौजे नविन शेवा येथील नागरीकांनी गरजेपोटी जी घरे बांधली आहेत त्याचे क्षेत्र सुमारे १० हेक्टर आहे. सदर जागेचा ताबा देणेचा झाल्यास जागेवर असलेली घरे पाडून जागा मोकळी करावी लागेल. तद्नंतर १९९० च्या आदेशानुसार भुखंड पाडून त्याचे वाटप

करावे लागेल. मात्र आजरोजी बांधलेली घरे ही पक्की असून ती पाडणे ही बाब नागरीकांना मान्य नाही. त्यामुळे यासाठी दुसरा पर्याय असा आहे की, नागरीकांना देय असलेल्या क्षेत्रामधून आजरोजी ताब्यात असलेले क्षेत्र वजा करुन उर्वरीत क्षेत्र हे २३ हेक्टर क्षेत्रामधून देणेत यावे. या प्रक्रियेस उपस्थित नागरीकांनी होकार दिला मात्र यासाठी सर्वप्रथम प्रत्येक प्रकल्पग्रस्ताचे ताब्यात असलेल्या क्षेत्राची मोजणी करणे आवश्यक आहे.

आपण दि.२१/०८/२०२५ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सर्व संबंधितांची बैठक घेवून सदर बैठकीमध्ये सदरची ३३ हेक्टर जमीन प्रथमत: जेएनपीए प्रशासनाच्या नावे करावी व तद्नंतर नविन शेवा ग्रामस्थांना देय असलेल्या भूखंड वाटपाबाबत अधिकार अभिलेख तयार करणेबाबत पुढील कार्यवाही करणेबाबत निर्देश दिले होते. वरील निर्देशांनुसार उपविभागीय अधिकारी, पनवेल यांजकडील पत्र दि.२२/०८/२०२५ अन्वये तहसिलदार उरण यांना सिडको विभाग व जेएनपीए यांचेशी समन्वय साधून अधिकार अभिलेख अद्यावत करणेबाबत निर्देशीत केलेले आहे. मात्र त्यानुसार अधिकार अभिलेख तयार करणेची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही. ग्रामपंचायत नविन शेवा (मुळ शेवा गाव) या गावातील ग्रामस्थांच्या जमिनी जेएनपीए साठी सिडकोमार्फत संपादीत केली आहे. प्रत्यक्ष राहत्या घरांची मोजणी करणेकरीता मोजणी फी चे चलन सादर करणेबाबत जेएनपीए प्रशासनाने दि.३०/०९/२०२५ रोजी उप अधीक्षक भूमी अभिलेख, उरण यांस कळविलेले आहे.

प्रस्तुत जमिन सिडको प्राधिकरणाच्या ताब्यात आहे. सदर जमिन प्रथम जेएनपीए प्रशासनाच्या नावे करणे आवश्यक आहे. तद्नंतर सदर जमिन महाराष्ट्र शासन/ग्रामपंचायत नविन शेवा यांचे नावे करणे आवश्यक आहे. सदर प्रक्रियेमध्ये केंद्र शासनाच्या परवानगीची आवश्यकता असल्याने निश्चित किती कालावधी लागेल हे सांगता येत नाही.

उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी दि.०६/१०/२०२५ रोजी या कार्यालयास सादर केलेल्या अहवालामध्ये नमूद केले आहे की, माहिती अधिकार अर्जान्वये अर्जदार यांनी मागणी केलेला नकाशा यापूर्वीच अर्जदारास पुरविण्यात आलेला आहे. सदरचे अपील व त्यामध्ये नमूद बाबी या प्रशासकीय निर्णयाशी निगडीत आहेत. सदर प्रकरणी मौजे नविन शेवा या गावाचे पुनर्वसनासाठी संपादित केलेली जमीन सद्यस्थितीत सिडको प्राधिकरणाच्या नावे असून सदर जमिनीचे हस्तांतरण जेएनपीए प्राधिकरणाच्या नावे होणे आवश्यक आहे. याकरीता यापूर्वी दि.२१.०८.२०२५ रोजी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे सर्व संबंधितांची बैठक घेऊन हस्तांतरणाची कार्यवाही करणेबाबत निर्देश दिले आहेत. तसेच व्यवस्थापकीय संचालक, सिडको व मुख्य व्यवस्थापक (प्रशा) व सचिव यांना या कार्यालयाकडील पत्र दि.०९/१०/२०२५ अन्वये निर्देश दिले आहेत. सदर जमिनीचे हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच कालबध्द कार्यक्रम आखून भुखंड वाटपासाठी नव्याने अभिन्यास तयार करता येईल. सदर बाबत जिल्हा प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही सुरु आहे. जमिनीचे हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर भूखंड वाटप करुन ७/१२ तयार करणेसाठी साधारण: दोन वर्षाचा कालावधी लागणार आहे."

त्यानंतर यासंदर्भात तोंडी निवेदन करताना श्री.किशन जावळे, जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी असे कथन केले की, जिल्हाधिकारी रायगड यांचे अधिसूचना क्रमांक टीएलसी/केस नं.३४/८६ दि.०५/०२/१९८८ नुसार भूमापन क्रमांक- ११२/१/२ ते ११२/१/३८, ११२/२, ११२/३/२० ते ११२/३/१२१, ११२/४ ते ११२/१६ इतके भूमापन क्रमांक रायगड जिल्ह्याच्या उरण तालुक्यातील नवीन शेवा गावासाठी राखीव केलेले आहेत.

या अधिसूचनेच्या प्रमाणे महसूल गावाची नोंद झाली आहे. या अधिसूचनेच्या आधारे फेरफार घेण्यात येऊन अधिकार अभिलेखामध्ये तशा प्रकारची दुरुस्ती करण्यात येईल व त्यानंतर विस्थापित झालेल्या गावकऱ्यांना शासनाच्या निकषांप्रमाणे जेवढी जमिन मिळण्यास ते पात्र असतील तेवढी जमिनीचे वाटप करण्यात येईल. त्यासाठी जमिनीची मोजणी उप अधीक्षक भूमी अभिलेख उरण यांचेकडून करुन घेण्यात येईल व त्याचा नकाशा तयार करण्यात येईल. तसेच त्यांचेकडून कमी जास्त पत्रक प्राप्त झाल्यानंतर प्रत्येक रहिवाशाला त्यांच्या पात्रतेप्रमाणे सनद देण्यात येईल.

यापैकी फेरफार घेण्याची कारवाई एका महिन्यात करण्यात येईल व उर्वरित कार्यवाही पुढील पाच महिन्यात करण्यात येईल व त्यानंतर या नकाशाची प्रत अपिलार्थी यांना देण्यात येईल. जिल्हाधिकारी यांच्या या निवेदनाची नोंद घेण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. श्री.किशन जावळे, जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांच्या वरील निवेदनाची नोंद घेण्यात आली आहे व त्या अनुषंगाने हे प्रकरण सहा महिन्यानंतर ठेवण्यात येत आहे. त्यापूर्वी जिल्हाधिकारी श्री.किशन जावळे यांनी त्यांचा पुर्तता अहवाल आयोगाकडे सादर करावा.

२. आयोगाच्या दि.११.१२.२०२५ रोजीच्या आदेशामध्ये रु.२५,०००/- इतकी नुकसानभरपाई देण्याबाबत जे आदेश दिले आहेत. ते रद्द करण्यात यावेत अशी श्री.किशन जावळे, जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी त्यांच्या दि.०६.०१.२०२५ रोजीच्या पत्रात विनंती केली आहे. त्यांच्या या विनंतीची नोंद घेण्यात आली आहे व याबाबत अंतिम निर्णय पुढील सुनावणीच्या वेळी घेण्यात येईल.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०६.०७.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०७ जानेवारी, २०२६.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
श्री.किशन जावळे, जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग,
हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

**अपिल क्रमांक : के.आर- २२६५/२०२२**
**अपिल क्रमांक : के.आर- २२६७/२०२२**
**अपिल क्रमांक : के.आर- २२६३/२०२२**
**सुनावणी दिनांक २७.७.२०२६ ( In Continuation of order dt.७.१.२०२६)**

## विवेचन

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुरेश राठोड, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. अविशकुमार सोनाने, उपजिल्हाधिकारी (भुसंपादन), मेट्रो सेंटर-१, उरण आणि श्री. भारत वाघमारे, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग हे उपस्थित आहेत

या प्रकरणी श्री. किशन जावळे, जिल्हाधिकारी, रायगड यांनी दि.२१.७.२०२६ रोजीच्या पत्रान्वये आयोगास त्यांचा लेखी अहवाल सादर केला. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अधिसूचना दि.१५.१.१९८८ अन्वये "नवीन शेवे" या नावाने स्वतंत्र गाव म्हणून जाहिर करण्यात आलेला आहे. प्रस्तुत नवीन शेवे या गावामध्ये मौजे बोकडविरा, ता. उरण, जि. रायगड येथील स. नं. ११२/१/३ व इतर या मिळकतींचा समावेश करण्यात आलेला आहे.

प्रकरणी उपविभागीय अधिकारी, पनवेल यांजकडील आदेश दि.१७.२.१९९० अन्वये, मौजे शेवा (मुळगाव) ता. उरण येथील २३७ कुटुंबीयांचे घराखालील संपूर्ण क्षेत्र गावांच्या वहिवाटीखाली रस्ते पायवाटासह संपूर्ण क्षेत्र न्हावा शेवा प्रकल्पासाठी सर्व ग्रामस्थांकडून विना मोबदला संपादन करण्यात आले होते. घराखालील जागेच्या मोबदल्यात तया गांवच्या ग्रामस्थांना मौजे बोकडविरा, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन एकूण क्षेत्र १५.७५.५० हे.आर. (ताळमेळ प्रमाणे १४.९२.५० हे. आर.) संपादन करून देण्यात आलेली आहे.

**जमिनीचा तपशिल परिशिष्ट-अ**

**मौजे बोकडविरा, ता. उरण, जि. रायगड**

| अ. क्र. | स. नं. /हि. नं. | क्षेत्र (हे.आर.) | अ.क्र. | स. नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ११२/१/२१ | ०.३५.५ | २४ | ११२/१/२५ | ०.२५.० |
| २ | ११२/१/२६ | ०.२६.० | २५ | ११२/१/२७ | १.२५.० |
| ३ | ११२/१/२८ | १.०२.० | २६ | ११२/१/२९ | ०.१७.० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | ११२/१/३० | ०.६३.० | २७ | ११२/३/३८ | ०.४५.० |
| ५ | ११२/३/३९ | ०.३५.० | २८ | ११२/३/४० | ०.२७.० |
| ६ | ११२/३/४१ | ०.४९.० | २९ | ११२/३/४२ | ०.१२.० |
| ७ | ११२/३/४३ | ०.४६.० | ३० | ११२/३/४४ | ०.४२.० |
| ८ | ११२/३/४९ | ०.३३.० | ३१ | ११२/३/५० | ०.३३.० |
| ९ | ११२/३/५१ | ०.३६.० | ३२ | ११२/३/५२ | ०.४१.० |
| १० | ११२/३/५३ | ०.२६.० | ३३ | ११२/३/५४ | ०.१६.० |
| ११ | ११२/३/५६ | ०.१९.० | ३४ | ११२/३/५७ | ०.२१.० |
| १२ | ११२/३/५८ | ०.४२.० | ३५ | ११२/३/५९ | ०.५४.० |
| १३ | ११२/३/६० | ०.४२.० | ३६ | ११२/३/६३ | ०.४६.० |
| १४ | ११२/३/६४ | ०.३८.० | ३७ | ११२/३/६५ | ०.४५.० |
| १५ | ११२/३/६६ | ०.८१.० | ३८ | ११२/३/६७ | ०.३८.० |
| १६ | ११२/३/६९ | ०.३८.० | ३९ | ११२/३/७२ | ०.१६.० |
| १७ | ११२/३/७४ | ०.२४.० | ४० | ११२/३/७५ | ०.३२.० |
| १८ | ११२/३/७६ | ०.२०.० | ४१ | ११२/३/७७ | ०.०८.५ |
| १९ | ११२/३/७८ | ०.०८.५ | ४२ | ११२/३/७९ | ०.१०.५ |
| २० | ११२/९ | ०.०१.५ | ४३ | ११२/१०/अ | ०.२५.० |
| २१ | ११२/१० ब | ०.११.० | ४४ | ११२/१०/क | ०.११.० |
| २२ | ११२/१० ड | ०.०३.५ | ४५ | ११२/१०/इ | ०.३.५ |
| २३ | ११२/२ | ०.२१.० | | | |

अधिसूचना क्र. साशा/कार्यासन-१/टीएलसी/केस क्र. ३४/८६, दिनांक १५ जानेवारी १९८८ अन्वये "नवीन शेवे" या नावांने स्वतंत्र गाव म्हणून जाहिर करण्यात आलेला आहे. प्रस्तुत नवीन शेवे या गावामध्ये मौजे बोकडविरा, ता. उरण, जि. रायगड येथील स. नं. ११२ या स. नं. च्या सर्व हिश्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार मौजे बोकडविरा या गांवी फेरफार क्र. ०१ दिनांक ११/११/२१ नोंदिवण्यात आलेला असून, सदरचा फेरफार मंडळ अधिकारी उरण यांचेकडून प्रमाणिक करण्यात आलेला आहे. सदरची नोंद उक्त दि.१५.१.१९८८ रोजीची अधिसूचना, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, उरण यांजकडील पत्र दिनांक ७.१०.२०२१ व तहसिलदार उरण यांजकडील पत्र दिनांक --/१०/२१ नुसार नोंदविण्यात आलेली आहे. त्यानुसार, मौजे बोकडविरा, ता. उरण येथील स. नं. ११२ चे मौजे नविन शेवा, ता. उरण येथे स. नं. १ मध्ये रूपांतरण करण्यात आले असून, पोट हिश्श्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

त्यानुसार, मौजे नविन शेवा (जुने गाव बोकडविरा), ता. उरण, जि. रायगड येथील उक्त नमूद मिळकतींच्या ७/१२ चे कब्जेदार सदरी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५० व महाराष्ट्र जमिन महसूल, अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ मधील नियम ३,५,६ आणि ७ अन्वये **"महाराष्ट्र शासन-नविन शेवे गावाचे पुनर्वसनाकरीता"** अशी नोंद फेरफार क्र. १९६८ दि. १२.१.२०२६ नुसार घेण्यात आलेली आहे. प्रकरणी उपविभागीय अधिकारी, पनवेल यांजकडील आदेश दिनांक १७.२.१९९० अन्वये उक्त परिशिष्ट अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या मिळकतींच्या एकूण ४५ हिश्श्यांचे एकत्रित सामलीकरण होऊन सदर क्षेत्राचे घरासाठी प्रदान करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने तहसिलदार उरण यांजकडील पत्र दिनांक १७.३.२०२६ अन्वये, उक्त **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेल्या मिळकतींचे महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार सामीलीकरण (Amalgmation) करणेचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, पनवेल यांजकडे पाठविण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने, उपविभागीय अधिकारी, पनवेल यांजकडील पत्र दि.२३.३.२०२६ व या कार्यालयाकडील पत्र दिनांक ६.४.२०२६ अन्वये उक्त मिळकतीचे सामीलीकरण (Amalgmation) करणेकरीता नियमोचित कार्यवाही करणेबाबत जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, उरण यांचेकडून प्रश्नाधिन मिळकतीची दि.१५.५.२०२६ रोजी मोजणी होऊन प्रस्तुत सामीलीकरण (Amalgmation) करणेचा प्रस्ताव मंजूरीसाठी जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, रायगड अलिबाग यांजकडे पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास दि.३.७.२०२६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने उप अधिक्षक, भूमि अभिलेख उरण यांचेकडून प्राप्त गाव कामगाराचे उपयोगाकरीता हिस्सा नमुना ११ व १२ अन्वये उक्त मिळकतींचे मौजे नविन शेवा, ता. उरण, जि. रायगड येथील फेरफार क्र. १९६९ अन्वये सामीलीकरण करण्यात येऊन, मौजे नविन शेवा, ता. उरण येथे स. नं. १/१/२१/अ एकूण क्षेत्र १३.१३.६० हे. आर. शासनातर्फे सिडको ४.१९.५० हे. आर. व महाराष्ट्र शासन नविन शेवे गावाचे पुनर्वसनाकरीता १४.९३.८० हे.आर. व महाराष्ट्र शासन नविन शेवे गावाचे पुनर्वसनाकरीता १४.९३.८० हे. आर. असा नविन ७/१२ घडविण्यात आलेला आहे.

तद्नंतर, मौजे नविन शेवा, ता. उरण येथील फेरफार क्र. १९७० ते १९७५ अन्वये उपविभागीय अधिकारी पनवेल यांजकडील आज्ञापत्र दि.१७.२.१९९० मधील नमूद वाटपग्रहींची नांवे त्यांना मंजूर क्षेत्रापुरता दाखल करण्यात आलेली आहेत. सोबत ७/१२ व फेरफार सादर करण्यात येत आहे.

तरी दि.११.१२.२०२५ रोजीचे दंडाबाबतचे आदेश रद्द करावेत अशी त्यांनी विनंती केली आहे.

या प्रकरणात जिल्हाधिकारी, रायगड यांनी प्रदिर्घ कालावधीपासून जी कार्यवाही प्रलंबित होती ती कार्यवाही पूर्ण केली आहे. याबाबीची आयोगाने नोंद घेतली आहे. श्री. किशन जावळे, जिल्हाधिकारी, रायगड यांनी या कामाची दखल घेऊन जवळपास ४० वर्षापासून प्रलंबित असलेला विषय मार्गी लावलेला आहे. त्यांनी सर्व स्थलांतरांची नावे अभिलेखात नमूद केलेली आहेत. ही बाब बघता जिल्हाधिकारी, रायगड या कार्यालयास रु. २५,०००/- इतकी नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्याची कार्यवाही करणे योग्य होणार नाही. सबब, दि.११.१२.२०२५ रोजीचे आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहेत. अपिलार्थी यांनीही सदरचे नुकसान भरपाईचे आदेश रद्द करण्यात यावेत अशी सुनावणी दरम्यान आयोगास विनंती केली आहे. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भुसंपादन), मेंट्रो सेंटर क्र. १, उरण यांनी नव्याने तयार करण्यात आलेल्या ७/१२ च्या प्रती पुढील १५ दिवसांत अपिलार्थीस शीघ्र टपालाने विनामूल्य पुरवाव्यात. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क. १, उरण यांनी नव्याने तयार करण्यात आलेल्या ७/१२ च्या प्रती पुढील १५ दिवसांत अपिलार्थीस शीघ्र टपालाने विनामूल्य पुरवाव्यात. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

**२. आयोगाच्या दि.११.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग या सार्वजनिक प्राधिकरणाला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(८) (ख) अंतर्गत रु.२५,०००/- इतकी नुकसान भरपाई अपिलार्थी यांना देण्याचे आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.**

३. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २७ जुलै, २०२६